# गोवंशासह 3 लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी केला जप्त




**नांदेड/ प्रतिनिधी**

गो व गोवंशाची अवैध वाहतूक रोखण्याचे निर्देश वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी दिल्याने कंधार पोलिसांनी गोवंशासह ३ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

जांब मार्गे कंधारकडे पिकअप वाहन क्र.एमएच-२६/ बीई- ८५४८ मध्ये गोवंश जातीची जनावरे कोंबून नेत आहेत अशी गोपनीय माहिती मिळाल्याने कंधारचे पोलिस निरीक्षक वसंत जाधव यांनी तात्काळ पोलिस पथक रवाना केले. या पथकातील उपनिरीक्षक गोपाळ इंद्राळे, सपोउपनिरीक्षक महागावकर, पोहेकॉ राजेश श्रीरामे, प्रकाश टाकरस, जुन्ने, धुतमल,रमेश जोगपेटे यांनी त्या भागात मौजे दिग्रस जवळ रस्तयावर वाहने अडवून तपासणी सुरु केली. त्यात उपरोक्त वाहनात ३ बैल दाटीवाटीने कोंबलेले आढळून आले. या बैलांची किंमत १ लाख ५ हजार रुपये आहे. तसेच वाहनाची किंमत २ लाख रुपये आहे.एकूण ३ लाख ५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी रिझवान खदीर कुरेश, रौफ मस्तान कुरेशी, अंकुश रेश्माजी कांबळे वाहन चालक यांचे विरुद्ध कंधार पोलीस ठाण्यात गुरन ३२०/२४ प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११ (क) (घ) (ड) (च) व महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५ (अ), ५ (ब) व मोटार वाहन कायदा कलम ६६/१९२ असा विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल (पान २ वर..)

दै. गोदातीर

# गोवंशासह ३ लाखांचा मुद्देमाल जप्त; कंधार पोलिसांची कारवाई

**नांदेड–** ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत कंधार पोलिसांनी ठाण्याच्या हद्दीत कारवाई करून तीन गोवंश जप्त केले. यावेळी आरोपींनाही अटक करून तीन लाखांचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.



पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून कंधार ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांच्या पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार जांब मार्गे कंधारकडे एक पीकअप वाहन (एमएच–२६–बीई– ८५४८) गोवंश जातीची जनावरे कोंबून जाणार होते. पोउपनि गोपाळ इंद्राळे, सपोउपनी महागावकर, पोहेकॉ श्रीरामे, पोना टाकरस पोकॉ जुने. पोकॉ धुतमल असे पोलीस पथक तयार करून त्यांना सदर भागात तैनात केले. दिग्रस जवळ रोडवर या संशयीत वाहनाची तपासणी करण्यात आली. त्यात गोवंश जातीचे तीन बैल किंमत १ लाख ५ हजार रूपयाचे व पिकअप वाहन किंमती २ लाख रूपये असा एकूण ३ लाख ५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गौवंश बैल जातीचे तीन जनावरे निर्दयतेने बांधून नेणारे रिझवान खदीर कुरेशी, रौफ मस्तान कुरेशी, अंकुश रेश्माजी कांबळे वाहन चालक यांच्याविरुद्ध कंधार पोलीस ठाण्यात प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० कलम ११(क) (घ) (ड) (च) व महाराष्ट्र प्राणी संरक्षण कायदा कलम ५ (अ). ५(ब) व मोटार वाहन कायदा कलम ६६/१९२ असा विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आहेत.

गुन्हे दाखल करण्यात

टीमने ही कारवाई केली. अशा जुगाराची माहिती द्यावी, असे आवाहन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले आहे.